# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील चर्मकार व गटई कामगारांना महानगरपालिका, नगरपरिषद क्षेत्र इ. ठिकाणी उपजीविकेसाठी स्टॉल्स मिळण्याबाबत**

**(१) ६०७८८ (२६-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चर्मकार व गटई कामगारांना महानगरपालिका, नगरपरिषद क्षेत्र इ. ठिकाणी रस्त्याच्या कडेला उपजीविकेसाठी स्टॉल्स मिळण्याच्या गेल्या अनेक वर्षाच्या मागणीबाबत शासनामार्फत स्थायी आदेश सर्व संबंधितांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व उपरोक्त आदेशांची अंमलबजावणी होण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, किती गटई कामगारांना स्टॉल्ससाठी अंतिमतः मंजूरी देऊन परवाने देण्यात आले आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३१३(ब) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३८५ नुसार हस्त व्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यासाठी परवाने देण्याची तरतुद विहित आहे. याच स्वरुपाची तरतुद महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम १९६६ मधील कलम १८७ मध्ये आहे. या तरतुदीनुसार गटई कामगारांना बैठे (पिच) परवाने देण्यासंदर्भात शासन आदेश दिनांक ०५ जून, २००० अन्वये महानगरपालिका व नगरपालिकांना सुचना दिलेल्या आहेत.

पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम २०१६ नुसार पथ विक्रेता समित्या स्थापन करण्याची तरतुद विहित केलेली आहे. या नियमानुसार गटई कामगार यांना बैठे परवाने देण्याबाबत महानगरपालिका व नगरपालिका स्तरावर कार्यवाही अभिप्रेत आहे.

(२) या योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या अखत्यारित संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत १००% अनुदानावर पत्र्याचे स्टॉल व रू.५००/- अनुदान देण्यात येते.
(३) राज्यातील २४ महानगरपालिकांकडुन प्राप्त माहिती नुसार गटई कामगारांना स्टॉल्ससाठी १९०५ परवाने देण्यात आले आहेत.

---

**कणकवली नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) हद्दीतील भाजी मार्केट आरक्षणाबाबत**

**(२) ८४८६० (२३-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) नगरपंचायत हद्दीतील भाजी मार्केटसाठी दिनांक २१ मे, २००८ च्या सर्वसाधारण सभेत आरक्षण क्र.२५ अन्वये जमिन संपादित करून विकसित करण्याबाबत नगरपंचायतीने ठराव पारित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपरिषदेच्या सदरहू ठरावाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, कणकवली यांनी मुख्याधिकारी कणकवली नगरपरिषद यांना आदेश दिले असतानाही सदरहू आदेशाची अंमलबजावणी न करता अधिकाराचा दुरूपयोग, आदेशाचे उल्लंघन व शासकीय नियमाचा भंग करून खाजगी विकासक मे.ग्लोबल असोसिएट यांच्याकडून दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी नवीन प्रस्ताव व दिनांक १६ जून, २०१६ रोजी फेरप्रस्ताव बेकायदेशीररित्या दाखल करून घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २१ मे, २००८ रोजीच्या सर्व साधारण सभेत भाजी मार्केटसाठी मंजूर करण्यात आलेला आरक्षण क्र.२५ डावलून मुख्याधिकाऱ्यांनी बेकायदेशीररित्या व शासकीय नियमांचे उल्लंघन करून मे.ग्लोबल असोसिएट यांचा नवीन प्रस्ताव दाखल करून घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) • दि.२१/०५/२००८ रोजी नगरपंचायत सर्वसाधारण सभेत पारित झालेला ठराव क्र.१४ प्रमाणे नगरपंचायतीने उपविभागीय अधिकारी, कणकवली उपविभाग (महसूल), कणकवली यांच्याकडे भूसंपादन प्रस्ताव सादर केला होता. तथापि, नवीन भुसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार प्रस्ताव तयार करुन सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबतचे अभिप्राय देऊन उप विभागीय अधिकारी यांनी सदर प्रस्ताव नगरपंचायतीस परत केला.

• त्यानंतर मे. ग्लोबल असोसिएट कणकवली यांच्या तर्फे दि.१२/०२/२०१६ व दि.१६/०६/२०१६ रोजी आरक्षण क्र. २५ भाजी मार्केट विकसित करणेबाबतचा प्रस्ताव टपालाद्वारे नगरपंचायतीस प्राप्त झाला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड जंजिरा नगरपरिषदेतील (जि.रायगड) संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्या रिक्त पदावर कर्मचारी उपलब्ध होणेबाबत**

**(३) ८६१४५ (२३-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड जंजिरा नगरपरिषदेतील (जि.रायगड) संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्या रिक्त पदावर कर्मचारी उपलब्ध होणेबाबत मुरुड जंजिरा नगरपरिषदेने वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) नगरविकास विभाग, शासन निर्णय दि. ०७.०३.२०१७ अन्वये राज्यातील महाराष्ट्र नगर परिषद राज्यस्तरीय ५ संवर्गातील (अग्नीशमन सेवा संवर्ग वगळून) एकूण १४८३ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
• तसेच महाराष्ट्र नगर परिषद राज्यस्तरीय संवर्गाचे “नियुक्ती प्राधिकारी” म्हणून आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय यांना घोषित करण्यात आले आहे.
• संवर्गातील पदभरतीच्या अनुषंगाने सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे व बिंदुनामावली प्रमाणित करून घेण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावर पूर्ण झाली आहे.
• सदर पदभरती प्रक्रियेअंतर्गत मुरूड जंजिरा नगर परिषदेतील रिक्त पदे भरण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूरमधील हेरिटेज वास्तूंचे सर्व्हेक्षण करुन त्यांच्या संरक्षणाबाबत धोरण निश्चित करण्याबाबत**

**(४) ८६१८० (२३-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कोल्हापूरमधील हेरिटेज वास्तूंचे सर्व्हेक्षण करुन त्यांच्या संरक्षणाबाबत धोरण निश्चित करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कोल्हापूर महानगरपालिकेला माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार हेरिटेज वास्तूंच्या संरक्षणाचे धोरण ठरविण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

• तथापी, एप्रिल, २०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने कोल्हापूर जिल्ह्यासाठी हेरीटेज कॉन्झर्व्हेशन कमिटी स्थापन करण्याबाबत आदेश दिले आहेत.

(२) मा.उच्च न्यायालयाने आदेशित करण्यापुर्वीच नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.१७/०४/२०१५ अन्वये कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील हेरीटेज स्थळांसाठी कॉन्झर्व्हेशन कमिटी स्थापन करण्यात आली आहे.

• तसेच नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.२९/०२/२०१२ अन्वये हेरीटेज कॉन्झर्व्हेशनसाठी नियमावली देण्यात आली असून त्यास अनुसरुन महानगरपालिका क्षेत्रातील हेरीटेज कॅान्झर्व्हेशन च्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील हेरीटेज कॅान्झर्व्हेशन कमिटीचे कामकाज वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुरु असून या कमिटीच्या दि.२१/०६/२०१७ पर्यंत २५ बैठका पार पडल्या आहेत.

---

**राजापूर नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) कार्यालयीन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले नसल्याबाबत**

**(५) ९२२५३ (२३-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) ३८ वर्ष जुन्या कार्यालयीन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमानुसार या इमारतींना ३० वर्षे पूर्ण झाल्यावर स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या व त्यानंतरच सुशोभिकरणासाठी निधी खर्च करण्यात यावा असे जिल्हाधिका-यांनी मुख्याधिकारी यांना पत्राद्वारे सूचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे असतानाही स्ट्रक्चरल ऑडिट न करताच सुशोभीकरणाचे काम घाईगडबडीने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
• परंतु, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या अनूषंगाने शासकिय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांच्याकडील तांत्रीक अधिकारी यांनी इमारतीची पहाणी केली असून त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(२) हे खरे नाही,
• इमारतीच्या भिंतींना अल्फो पॅनल सीट बसवण्याचे काम केलेले असल्यामुळे राजापूर नगरपरिषदेची इमारत सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही.
• तथापि, जिल्हाधिकारी यांनी नगरपरिषदेच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन नगरपरिषदेच्या निर्णयानुसार इमारतीवर खर्च करणे उचित होईल व याकामी नगरपरिषद स्तरावर योग्यतो निर्णय घ्यावा, असे कळविले होते.
(४) हे खरे नाही.
• नगरपरिषदेने कार्यालयीन इमारतीच्या भिंतीला अल्फो पॅनल सीट बसविण्याचे काम विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन नगरपरिषदेच्या निधीमधून करुन घेतले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू नगरपरिषद (जि.पालघर) येथील मौजे लोणीपाडा**
**गट क्र. १४२ आदिवासी जागेत बांधलेल्या चाळींबाबत**

**(६) ९३०८१ (२३-०८-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू नगरपरिषद (जि.पालघर) येथील मौजे लोणीपाडा गट क्र. १४२ आदिवासी जागेत बांधलेल्या चाळींना जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८)** :(१) होय, हे खरे आहे.

• दि.१८/०४/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन तपासणी केली असता डहाणू नगरपरिषद हद्दीतील मौजे लोणीपाडा गट क्र.१४२, आदिवासी जागेत काही परवानगी विना बांधकामे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) डहाणू नगरपरिषदेने मौजे लोणीपाडा येथील आदिवासी जागेत कोणत्याही इमारती अथवा चाळींना परवानगी दिलेली नाही. तथापि, सखोल चौकशी करुन अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) पश्चिम येथील रेतीबंदर खाडी भागात होत असलेली बेकायदा बांधकामे**

**(७) ९४९८० (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) पश्चिम येथील रेतीबंदर खाडी हा भाग डोंबिवलीतील `हरीतपट्टा' म्हणून शासनाने घोषित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने रेतीबंदर भागातून गणेशघाट ते मानकोली असा उड्डाणपूल मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भाग व परिसरातील भोपर आयरे गाव कोपर पूर्व व पश्चिमेतील रेती बंदर खाडी इत्यादी भागात खारफुटीची बेकायदा कत्तल करून त्यावर बेकायदा चाळी बांधल्या जात असून कोपर पूर्व आणि ठाकुर्ली मोठा गाव येथील चाळी प्रकरणी पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व खाडीकिनारी (CRZ) बेकायदा बांधकामे होऊ नये यासाठी शासनाचे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील डोंबिवली पश्चिम येथील प्रस्तावित ४५ मी. रुंद बाह्यवळण रस्त्याच्या खाडीकडील वाजूस सी.आर.झेड. (CRZ) क्षेत्र, हरीत क्षेत्र, रहिवास क्षेत्र, तसेच विविध आरक्षणे दर्शविलेली आहेत.

• मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने रेतीबंदर गणेशघाट जवळ खाडीवर उड्डाणपूल मंजूर असून, सदर खाडीवर उड्डाणपूल बांधण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत सुरू आहे.

(३) व (४) • मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांच्या दि.०८/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीवरील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची संयुक्त कारवाई करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

• उपविभागीय अधिकारी (महसूल), कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून, निष्कासनाच्या कार्यवाहीसाठी लागणारी आवश्यक साधन सामग्री व मनुष्यबळ महानगरपालिकेने वेळोवेळी उपलब्ध करुन दिले आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, पोलिस प्रशासन, महसूल विभाग व बंदर विभाग यांनी एकत्रितरित्या पाहणी करुन महानगरपालिकेमार्फत डोंबिवली (प.) येथील रेतीबंदर, मोठागांव व ठाकूर्ली येथील खाडीकिनारी रेती उपसाकरीता असलेले सिमेंट कॉक्रिटचे ३० हौद दि.१/८/२०१७ व दि.२/८/२०१७ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहेत.

• सदर कारवाईमध्ये महसूल विभागामार्फत बांधकामधारकाविरोधात विष्णूनगर पोलिस स्टेशनमध्ये दि.२१/०७/२०१७ रोजी ३ गुन्हे दाखल केले आहेत.

• डोंबिवली पश्चिम येथील देवीचा पाडा, स्मशानभूमीच्या मागे, खाडीकिनारी सी.आर.झेड. मध्ये येणाऱ्या चाळीचे अंदाजे ३५ ज्योत्यांचे १०x२० चौ.फुट क्षेत्राचे बांधकाम दि.०८/११/२०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले.

• तद्नंतर पोलिस प्रशासन, महसूल विभाग, महानगरपालिका, बंदर विभाग व कांदळवन समितीचे पदाधिकारी यांनी दि.१५/११/२०१७ रोजी संयुक्त पाहणी करुन, याबाबत विष्णूनगर पोलिस स्टेशन, डोंबिवली (प.) येथे महसूल विभागामार्फत ७ व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

• महानगरपालिकेमार्फत दि.२०/११/२०१७ रोजी ६ खोल्यांचे चालू बांधकाम निष्कासित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ६६ अतिधोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(८) ९५१७१ (३०-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ६६ अतिधोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा निर्णय झाला असूनसूध्दा त्याबाबतच्या प्रस्तावांना अद्याप म्हाडाद्वारे मान्यता देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या कामाचा वेग वाढविण्यासाठी कर्मचारी वर्ग देखील कमी असल्याची माहिती मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्यासाठी म्हाडाने २०० कोटींच्या निधीची मागणी शासनाकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हाडाच्या विलंबामुळे अतिधोकादायक इमारतीत राहणाऱ्या लोकांच्या जीवाला धोका असून याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
म्हाडाने पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाकडे २०० कोटीच्या निधीची मागणी केली नसून उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी २०० कोटीच्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे. सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) मुंबईतील पंतप्रधान अनुदान योजनेअंतर्गत (PMGP) ६६ इमारतींपैकी २० इमारतींची समूह पुनर्विकास योजना विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत राबविण्यास म्हाडा प्राधिकरणाने मंजूरी दिली असून, त्यानुसार या योजनांसाठी वास्तुशास्त्रज्ञ/ प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंन्ट यांची नेमणूक करुन सविस्तर प्रस्ताव उच्च स्तरीय समितीकडे सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

उर्वरित ४६ पंतप्रधान अनुदान योजनेअंतर्गत (PMGP) इमारतींची पुनर्रचना विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत शक्य नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारती व पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास करण्याची तरतूद नसल्याने या ४६ इमारतींची पुनर्रचना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारती व पुनर्रचित इमारतींचा अंतर्भाव करण्याची शिफारस प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये मंडळाने दि.२८.०७.२०१६ रोजी करण्यात आली आहे. विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये याप्रमाणे स्पष्ट तरतूद झाल्यानंतर या ४६ इमारतींच्या पुनर्रचनेबाबत कार्यवाही करणे शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोताळा नगरपंचायतीचे (जि.बुलडाणा) मुख्याधिकारी नगरपंचायत कार्यालयात व मुख्यालयात राहत नसल्याबाबत

**(९) ९५६०२ (०१-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा नगरपंचायतीचे (जि.बुलडाणा) मुख्याधिकारी नगरपंचायत कार्यालयात व मुख्यालयात राहत नसल्यामुळे नगर पंचायत हद्दीतील अनेक विकास कामे, झालेल्या विकास कामाची देयके, प्रस्तावीत कामाची अंदाजपत्रके तसेच इतर प्रशासकीय कामे रखडली असल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुख्याधिकारी कार्यालयात हजर राहत नसल्याने नगरपंचायतीचा पत्रव्यवहार सुध्दा संगणकावर स्कॅन केलेल्या सही ने केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार वारंवार कार्यालय व मुख्यालयात गैरहजर राहणा-या मुख्याधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मोताळा नगरपंचायतीमधील ऑनलाईन पत्रव्यवहारासाठी डिजिटल सिग्नेचरचा वापर केला जात असून, इतर पत्रव्यवहार मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने केला जातो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील मांजर्ली डी.पी. रस्त्याबाबत**

**(१०) ९५७३४ (०२-०१-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील मांजर्ली डी.पी. रस्त्यालगत असलेल्या संरक्षण भिंतीमुळे रस्ता अरुंद झालेला असून डी.पी.रस्ता मंजूर असूनही या संरक्षण भिंतीमुळे अडथळा निर्माण होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डी.पी.रस्ता मंजूर असताना नगरपालिकेने या जागेत संरक्षण भिंत बांधण्यास परवानगी कोणत्या नियमान्वये दिली आहे,
(३) असल्यास, बेकायदेशीपणे कंपाऊंड टाकणाऱ्या विकासकावर व नगरपालिकेच्या नगररचना विभागातील सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील मांजर्ली डी.पी. रस्त्यालगत असलेल्या संरक्षण भिंतीमुळे उपरोक्त रस्त्याचे रुंदीकरणात अडथळा येत आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर जागा ही खाजगी मालकाची असून त्या जमीनीवर विटेची/ पत्र्याची संरक्षक भिंत बांधलेली आहे. सदर जागा डी.पी. रस्त्याकरीता हंस्तातरीत करण्यात आलेली नाही व भिंत बांधकामाकरीता कोणतीही बांधकाम परवानगी नगरपरिषदेकडून घेतलेली नाही.
(३) सदर जागेबाबत वाद असल्याने रस्त्याची मोजणी करणेकरीता उप अधिक्षक, भुमी अभिलेख, अंबरनाथ यांच्या स्तरावर कार्यवाही होणे प्रलंबित असून सदर मोजणी तसेच जागेचे हस्तांतरण नगरपरिषदेस झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे..
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहुर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी बसस्थानक चौकातील अस्थायी दुकानांचा विनापरवानगी बनावट दस्तावेजाच्या आधारे लिलाव केल्याबाबत**

**(११) ९७०५६ (०१-०१-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे यांनी नगरपंचायतीच्या सहकाऱ्यासोबत संगनमत करुन बसस्थानक चौकातील अस्थायी दुकानांचे विनापरवानगी बनावट दस्तावेजाच्या आधारे लिलाव केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे यांनी एकाच दिवशी ठराव, लिलाव व वाटप प्रक्रिया करुन ३१ व्यापाऱ्यांना दुकाने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट पावत्यांच्या आधारे खोटा रेकॉर्ड तयार करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे यांना शासकीय सेवेतून ग्रामविकास विभागाने कायमस्वस्पी काढून टाकले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामविकास विभागाने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेवून चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१८) : (**१), (२), (३), (४) व (५) नगरपंचायत माहूर यांचेमार्फत ठराव क्र. ०५ दिनांक १४.०२.२०१७ अन्वये अतिक्रमण हटविलेल्या जागेवर कायमस्वरुपी / तात्पुरत्या स्वरुपात गाळे उभारण्याचा निर्णय घेतला.

- सदर ठरावानुसार दिनांक २८.०५.२०१७ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिध्दी देऊन दिनांक ०८.०६.२०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सभेने ठरावाव्दारे निर्देशित केल्यानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करुन एकूण २५ दुकान व्यवसायिकांना लिलावाव्दारे व्यवसायासाठी टिनशेड जागा वाटप केल्या आहेत, हे खरे आहे.
- ज्या दुकान धारकांनी लिलावात भाग घेतला त्या दुकान धारकांना प्रमाणित पावती पुस्तकातून पावत्या दिलेल्या आहेत.
- उपरोक्त वस्तुस्थिती पहाता मुख्याधिकारी, माहूर नगरपंचायत यांच्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद शहरातील घर क्र.२२/६३ मधील अनधिकृत बांधकामाबाबत

**(१२) ९७६५२ (०३-०१-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरातील घर क्र.२२/६३ मध्ये नगरपरिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ रोजी वा त्या सुमारास ६४२.३५ चौ.मी.क्षेत्रासाठी बांधकाम परवाना दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ जुलै, २०१० रोजी नगरपरिषद कार्यालयाचे पत्र क्र.१०३१७ अन्वये बांधकाम वापर परवाना देण्यात आला असला तरी सदर घर क्र.२२/६३ मध्ये परवानगीपेक्षा ५५२.८५ चौ.मी.चे जास्त बांधकाम झाले हे तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष

जागा पाहणी करुन जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ७ मार्च, २०११ रोजी वा त्या सुमारास प्राप्त झालेल्या अहवालानुसार सिध्द झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत (मंजूर बांधकामापेक्षा जास्त) बांधकाम करणाऱ्या व नियमबाहय बांधकाम होऊनही बांधकाम वापर परवाना देऊन पदाचा दुरुपयोग करुन बांधकामास संरक्षण देणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०२-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. ४८७.८१ चौ.मी. बांधकामास परवाना दिलेला आहे.
(३) सदर प्रकरण मा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी स्तरावर असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट असल्याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद उस्मानाबाद यांनी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीबाबत**

**(१३) ९७९९८ (०३-०१-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचा आराखडा निश्चित होऊन १२ वर्षे उलटूनही अद्यापही प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू इमारतीचे बांधकाम तातडीने सुरु करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) होय, ही वस्तुस्थिती आहे.
(२) कोल्हापूर महानगरपालिकेने सन२००४ मध्ये बी वॉर्ड येथिल जागेवर नविन प्रशासकीय इमारत उभारण्याचे नियोजन केले होते.
• तथापि, कोल्हापूर महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या व वाढत्या प्रशासकीय बाबी लक्षात घेऊन बी वॉर्ड येथिल पूर्व नियोजित जागा अपुरी पडणार असल्याने सदर जागेऐवजी, मैल खड्डा-निर्माण चौक येथिल जागेवर नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्याचे नियोजन महानगरपालिकेच्या दि.१६.०९.२०१४ रोजीच्या बैठकीत करण्यात आले आहे
(३) प्रस्तावित प्रशासकीय इमारतीचा खर्चीक आराखडा व महानगरपालिकेची सद्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन सदरची कामे टप्प्या टप्प्याने हाती घेण्याचे व त्याकरीता आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून घेण्यासंदर्भात महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागात स्वच्छता अभियानाची योजना अयशस्वी झाल्याबाबत**

**(१४) ९८१७७ (२९-१२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागात स्वच्छता अभियानांतर्गत हागणदारी मुक्त योजना अयशस्वी झाली असून येथील जिल्हाधिकारी कार्यालय व नियोजन भवन येथील रस्त्यावर काही जण उघडयावर शौचास बसत असल्याचे व उक्त अभियान कागदोपत्री सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयामध्ये आर्थिक दुर्लबांसाठी बीएसयुपी योजनेंतर्गत बांधलेल्या घरकुलातील शौचालयांचा वापर भंडारगृहासाठी केला जाऊन उघडयावर शौचास जाणे कायम असल्याचा तटस्थ समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभियानाचा उपरोक्त जिल्हयातील गावांत व तालुक्यात प्रचार आणि प्रसार करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी विलंब करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली व उक्त अभियान यशस्वी होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१८) :**(१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत महाराष्ट्रातील नागरी भाग दि.१ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय व नियोजन भवन येथील रस्त्यावर काहीजण उघड्यावर शौचास बसत असल्याचे आढळून आलेले नाही. नांदेड शहर हागणदारी मुक्त झाल्यानंतर त्याठीकाणी गुड मॉर्निंग व गुड ईव्हीनींग पथकांमार्फत ओडी वॉच ठेवण्यात येत आहे. तसेच नागरीकांना उघडयावर शौचास बसण्यास परावृत्त करून शौचालयाचा वापर करण्यास प्रवृत्त केले जाते.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकारी पद रिक्त असल्याबाबत**

**(१५) ९९११४ (०१-०१-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकारी पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकारी नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मुख्याधिकारी पद किती कालावधीत भरण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) विक्रमगड नगरपंचायतीसाठी डॉ.धिरज चव्हाण, परिविक्षाधीन मुख्याधिकारी यांची दि.१७.१२.२०१६ अन्वये नेमणूक करण्यात आली होती. सदर पदावर ते दि.२१.१२.२०१६ पासून कार्यरत होते. दरम्यानच्या कालावधीत ते दि.०६.०३.२०१७ पासून वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्याने सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्याधिकारी, जव्हार नगरपरिषद यांचेकडे सोपविण्यात आला होता. तद्नंतर, श्री.धिरज चव्हाण हे दि.१२.११.२०१७ पासून मुख्याधिकारी, विक्रमगड नगरपंचायत या पदावर रूजू झालेले आहेत. यास्तव, मुख्याधिकारी, विक्रमगड नगरपंचायत हे पद सद्य:स्थितीत रिक्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील अनेक एलईडी दिवे सध्या बंद असल्याबाबत**

**(१६) ९९८८५ (०१-०१-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरात अनेक एलईडी दिवे सध्या बंद आहेत त्यामुळे निकृष्ट दर्जाचे एलईडी दिवे बसविणा-या ठेकेदाराची चौकशी व्हावी व मगच त्याला बिल अदा करावे अशी मागणी येथील नगरसेवकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व सदरहू एलईडी दिवे बसविणा-या कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८)** : (१) अशा आशयाच्या तक्रारी नगरपरिषद प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) चिपळूण शहरात बसविण्यात आलेल्या एल.ई.डी. दिवे, शहरातील इलेक्ट्रीसिटी पोलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने बंद पडल्याचे निदर्शनास आले असून त्यामध्ये सुधारणा करणे, दंडात्मक कार्यवाही करुन उपरोक्त ठेकेदाराकडून काम पूर्ण करुन घेणे, झालेल्या कामाची तांत्रिक तपासणी विद्युत सल्लागारामार्फत करुन कामाचे देय असलेले बिलाची रक्कम अदा करणे या विषयी नगरपरिषदेच्या विशेष सभेत ठराव मंजूर झाला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे नगरपरिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली, मिरज व कुपवाड (जि.सांगली) महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने बेकायदेशीरपणे लाखो रुपयांच्या औषधांची खरेदी केल्याबाबत**

**(१७) १०१४२२ (०३-०१-२०१८). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड (जि.सांगली) महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने बेकायदेशीरपणे लाखो रुपयांच्या औषधांची खरेदी केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषी आढळल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८)** : (१) व (२) अशा आशयाची तक्रार महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

तथापि, डास आळी, प्रतिबंधक द्रव्य किटक नाशक औषध खरेदीबाबत स्थायी समितीच्या ठरावाद्वारे दिलेल्या मान्यतेनुसार रीतसर प्रक्रिया राबवुन माहे ऑगस्ट २०१७ - ऑक्टोंबर २०१७ या कालावधीत महानगरपालिकेच्या प्रभाग निहाय आवश्यकतेनुसार औषधांची खरेदी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण शहरातील (जि.रत्नागिरी) पाग विभागामध्ये चिपळूण नगरपरिषदेमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यातून साप सदृश्य प्राणी येत असल्याबाबत**

**(१८) १०२००१ (०३-०१-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण शहरातील (जि.रत्नागिरी) पाग विभागामध्ये चिपळूण नगरपरिषदेमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यातून साप सदृश्य प्राणी येत असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेठमाप व गोवळकोट भागांनाही दररोज अनियमित व अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यापूर्वीही तीनवेळा असा प्रकार घडलेला असून प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे असे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक प्रकार वारंवार घडत असल्याचेही स्थानिक लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील उपरोक्त भागांना योग्य प्रमाणात व शुद्ध पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) व (२) • अशा आशयाच्या तक्रारी नगरपरिषदेस प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.
(३) एकाच खाजगी नळ कनेक्शन धारकाकडे दोनवेळा असा प्रकार घडल्याची तक्रार नगरपरिषदेस प्राप्त झाली.
• प्राप्त तक्रारीनंतर त्वरीत संबंधित भागातील पाईपलाईन तपासण्यात आली.
• पाणी पुरवठा करणारी टाकी नव्याने स्वच्छ करुन पाईपलाईनची गळती दुरुस्त करण्यात आली.
• सदर तक्रार वगळता अन्यत्र कोठेही अशी बाब निदर्शनास आली नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व भागामधील पाण्याचे शुध्दीकरण करुन तसेच पाण्याचे नमूने तपासून पाणी पिण्यास योग्य असल्याची खात्री झाल्यानंतरच शहरास पाणी पुरवठा करण्यात येतो.
• चिपळूण शहरात ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा करण्याची योजना नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित असून कोळकेवाडी धरणातून ६ दशलक्ष घ. मी. पाण्याचा साठा आरक्षीत करण्यात आला आहे.
• सदर योजनेचा डि.पी.आर. तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून सर्व्हेक्षणाचे काम सुरु असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषद अखत्यारित असलेल्या इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या कामाबाबत**

**(१९) १०२००३ (०१-०१-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) अखत्यारित असलेल्या इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचे मागील दोन वर्षापासून सुरू असलेले नूतनीकरणाचे काम अजूनही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिपळूण नगरीमध्ये असलेले एकमेव सांस्कृतिक केंद्र दुरुस्ती वा नुतनिकरणाअभावी बंद असल्यामुळे कला रसिक व नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सांस्कृतिक केंद्राचे काम अद्याप पूर्ण न करण्याचे कारणे काय आहेत व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१८) :** (१) व (२) चिपळूण नगरपरिषद अखत्यारित असलेल्या इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचे नुतनीकरण करणेंतर्गत स्थापत्यविषयक काम बऱ्याच अंशी पूर्ण झाले असले तरी, विद्युतीकरण, फर्निचर व वातानुकूलनाचे कामे अद्यापी पूर्ण झालेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या नुतनीकरणाचे काम ७० टक्के पूर्ण झाल्यानंतर या कामाकरीता नियुक्त तज्ञ सल्लागाराच्या प्रकृती अस्वास्थामुळे सदर काम प्रलंबित राहीले आहे.
• नुतनीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याकरीता नव्याने तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
• त्यांच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित काम पूर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) येथील विविध प्रलंबित कामांबाबत**

**(२०) १०२५३९ (०१-०१-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथील विविध प्रलंबित कामांबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (चाळीसगाव) यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनावर कधीपर्यंत कार्यवाही करण्यात येणार आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ नगरपालिकेस सन २०११-१२ साठी दिलेला आमदार निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२१) १०४८९३ (०३-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ नगरपालिकेस सन २०११-१२ साठी दिलेला आमदार निधी अखर्चित राहिला असून त्याची चौकशी करुन दोषी आढळणा-या व्यक्तींवर कारवाई करावी असे पत्र दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पत्रानूसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाद्वारे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०११-१२ चा निधी खर्च न झाल्याबाबत चौकशी करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन समिती, जळगांव यांनी जिल्हाधिकारी, जळगांव यांना कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने भुसावळ नगरपालिकेस चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार सन २०११-१२ या आर्थिक वर्षात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत दिलेल्या संपुर्ण निधीतील अखर्चित निधी व्याजासह रक्कम रु.८०,७५,३५९/- भारतीय स्टेट बँक, भुसावळ शाखा येथे दि.१८.०४.२०१६ रोजी चलनाद्वारे शासन कोषागारात जमा केली असल्याचे जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला(जि.नाशिक) नगरपालिका क्षेत्रातील राजे रघुजीबाबा स्मारक येथे मुलभूत सोईसुविधा पुरविणेबाबत

**(२२) १०५२२२ (१८-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला(जि.नाशिक) नगरपालिका क्षेत्रातील ‘क’ वर्गीय पर्यटनस्थळ असलेल्या राजे रघुजीबाबा स्मारक या ठिकाणी येणाऱ्या पर्यटक व यात्रेकरुंना पुरेशा नागरी व मुलभूत सोयीसुविधांसाठी निधी मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मागणीच्या अनुषंगाने सदर पर्यटनस्थळासाठी निधी मिळण्याकरिता माहे जानेवारी, २०१८ पर्यंत शासनाकडे प्रस्ताव सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील विलंबाबाबत शासनाकडून चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०४.०३.२०१७ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे पत्र देवून निधीची मागणी केली आहे.

(२) व (३) राजे रघुजीबाबा स्मारकास “क” वर्ग पर्यटन स्थळाचा विकास होण्याच्या दृष्टीने काम होण्याबाबत जिल्हा नियोजन अधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या दि.२२.०६.२०१७ च्या पत्रान्वये अंदाजपत्रकासहीत परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत येवला नगरपरिषदेस कळविण्यात आले आहे.

परंतु सदरची जागा ट्रस्टच्या मालकीची असल्याने ट्रस्टची ना-हरकत प्राप्त झालेली नाही. सदर ट्रस्टची ना-हरकत प्राप्त झाल्यानंतर शासनास सविस्तर प्रस्ताव पाठविणे शक्य होणार असल्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने विविध तालुक्याच्या ठिकाणी नगरपंचायतीची स्थापना केलेली असतानाही नागरीकांना मुलभूत सुविधा देताना अडचणी येत असल्याबाबत

**(२३) १०६२३८ (१८-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विविध तालुक्याच्या ठिकाणी नगरपंचायतीची स्थानपा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीचे कामकाज पाहण्यासाठी मुख्याधिकारी वगळता अधिकारी व पुरेसे कर्मचारी नसल्याने कोणतीही विकास कामे होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकारी व कर्मचारी नसल्याने नागरीकांना मुलभूत सुविधाही देताना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने आधिकारी व कर्मचारी तात्काळ नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्यातील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नवनिर्मित १०१ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या आकृतीबंधास दि.०५.०७.२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली असून, २७ नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या आकृतीबंधास दि.२२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये भूतपूर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशन संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांच्याकडून करण्यात येत आहे.

नगरपंचायतींमधील रिक्त पदांचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून या नगरपंचायतींची कामे सुरू आहेत.

तसेच, महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील एकुण १८८९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता संचालनालयाकडून दि.०७.०४.२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार महापरीक्षा पोर्टल या यंत्रणेमार्फत दि.१८.०५.२०१८ ते दि.२३.०५.२०१८ या कालावधीत पूर्व परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

---

**अकोले (जि. अहमदनगर) येथे दोन वर्षापूर्वी शासनाने स्थापना केलेल्या नगरपंचायतीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत**

**(२४) १०७१३८ (१४-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि. अहमदनगर) येथे दोन वर्षापूर्वी शासनाने नगरपंचायतीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीचे कामकाज पाहण्यासाठी मुख्याधिकारी वगळता अधिकारी व पुरेसे कर्मचारी नसल्याने कोणतीही विकास कामे होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकारी व कर्मचारी नसल्याने नागरीकांना मुलभूत सुविधाही देताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने आधिकारी व कर्मचारी तात्काळ नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अकोले नगरपंचायतीकरीता कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

• ग्रामपंचायतकालीन कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

• सदर समितीमार्फत समावेशनाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याची कार्यवाही पूर्ण झाली असून, एकूण १० ग्रामपंचायतकालीन कर्मचाऱ्यांचे अकोले नगरपंचायतीमध्ये समावेशन करण्यात आले आहे.

• नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून अकोले नगरपंचायतीमध्ये कार्यालयीन निरिक्षक हे पद भरण्यात आले आहे.

• नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून परिषद संवर्ग कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील घरांचा सर्व्हे चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याने सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर टॅक्स आकारणी करण्यात आल्याबाबत**

**(२५) १०९५९३ (०३-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील घरांचा सर्व्हे चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याने सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर टॅक्स आकारणी करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेडिरेकनरला आधार मानून वार्षिक भाडे मूल्यांवर टॅक्स आकारणी करून महानगरपालिकेच्या कर व कर आकारणी विभागाकडून टॅक्सचा डिमांड पाठविला जात असून यात ५०० रुपये टॅक्स भरणा असणा-यांना ११ ते १२ हजार तर १ ते २ हजार रुपये टॅक्स भरणा-यांना २५ ते ३० हजार रुपये टॅक्स आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून विविध राजकीय पक्षांनी जाचक टॅक्सवाढ मागे घेण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ मधील कराधान नियम क्र.९ नुसार आकारणी पुस्तक तयार करुन व कराधान नियम क्र.१३,१४ व १५ मधील तरतुदीनुसार, मालमत्तेच्या बांधकामाचा प्रकार, क्षेत्रफळ, प्रयोजन, इमारतीचे वय इ. प्रकाराची अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे माहिती संकलित करुन व त्याची पुर्नतपासणी करुन, मालमत्ता कराची आकारणी केली जात असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## नागपूर शहरातील अनेक बार आणि रेस्टॉरंट चालकांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याबाबत

**(२६) १०९६०२ (११-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अनेक बार आणि रेस्टॉरंट चालकांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्रच घेतले नसल्याची धक्कादायक माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कमला मिल कंम्पाऊंडमधील घटनेची पुर्नरावृत्ती नागपूरमध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कार्यवाही करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

शहरातील ३०२ बार आणि रेस्टॉरंट चालकांपैकी २९३ चालकांनी नागपूर महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून प्रथम नाहरकत प्रमाणपत्र घेतले असून, यापैकी ०२ चालकांनी अंतीम नाहरकत प्रमाणपत्र घेतले आहे. उर्वरित चालकांविरुध्द अग्नीसुरक्षा व जीवसंरक्षक अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) अशी वस्तुस्थिती नाही.

तथापि, नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून अशा घटना घडू नयेत म्हणून अशा आस्थापनांची आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार वेळावेळी तपासणी करुन, आवश्यक ती कार्यवाहीही केली जात आहे.

---

## परभणी महानगरपालिकेंतर्गत अग्निशमन विभागात मंजूर पदांपैकी केवळ ९ पदे भरण्यात आल्याबाबत

**(२७) १०९८४४ (१२-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेंतर्गत कार्यरत असलेल्या अग्निशमन विभागात मंजूर असलेल्या अग्निशमन अधिका-यासह ६७ फायरमन व १९ चालकाच्या पदांपैकी केवळ ९ पदे भरण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ९ पदांपैकी ३ फायरमनीची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याची कारणे काय आहेत व ती तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) परभणी शहर महानगरपालिके अंतर्गत कार्यरत असलेल्या अग्निशमन विभागात अग्निशमन अधिकाऱ्यांसह ६७ फायरमनची व १८ वाहन चालकांची मंजूर पदे असून, त्यापैकी १ फायरमन व २ वाहनचालक अशी ३ पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) उपरोक्त भरण्यात आलेल्या ३ पदांव्यतिरिक्त फायरमनची ७ पदे व वाहन चालकाचे १ पद अशी एकूण ८ पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात आलेली आहेत.

(३) • महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधामध्ये रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आस्थापना खर्चाची अट नमूद करण्यात आलेली आहे.

• महानगरपालिकेचा आस्थापना खर्च जास्त असल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत.

• महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी मालमत्ता करवाढ, वसुलीबाबतची आवश्यक कार्यवाही करण्यात येत असल्याचे परभणी शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (ता.जि.नाशिक) महानगरपालिकामार्फत आयएचएसडीपी योजना राबविण्यात येत असल्याबाबत

**(२८) १०९९८१ (०३-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) महानगरपालिकामार्फत आयएचएसडीपी योजना राबविण्यात येत असुन या योजनेंतर्गत अतिक्रमीत झोपडपट्टीवासियांचे स्थंलातर करावयाचे असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना प्रकल्पाच्या ठिकाणी मंजुर घटकानुसार व्यक्तीगत घरकुल व्यतिरिक्त रस्ते, गटारे, अंतर्गत विद्‌युत पुरवठा, बाहय विद्‌युत पुरवठा, पाणीपुरवठाकरिता जलकुंभ, किऑस, इन्फॉर्मल मार्केट, कम्युनिटी हॉल, शासन निर्णयानुसार अंशदान रक्कम इत्यादी आवश्यक कार्यवाही करुन ही योजना लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय.

(२) आयएचएसडीपी योजनेंतर्गत घरकुल योजनेच्या ठिकाणी मंजूर प्रकल्प अहवालानुसार रस्ते, पाणीपुरवठाकरीता जलकुंभ व पाईपलाईन, मलनि:स्सारण व्यवस्था, मलशुध्दीकरण केंद्र, अंतर्गत व बाहय विद्‌युत व्यवस्था, कम्युनिटी सेंटर इत्यादी कामे फेज १, २ व ३ साठी पुर्ण असून, किऑक्स, इन्फार्मल मार्केट ही कामे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच शाळा इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांनी अंशदान रक्कम भरणे आवश्यक असल्याने, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी जाहीर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.विविध झोपडपट्टीमधील अंशदान रक्कम भरलेल्या लाभार्थ्यांना टप्प्या-टप्प्याने ड्रॉ पध्दतीने सदनिका वाटपपत्र देण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असून, अंशदान रक्कम भरलेल्या १०३४ पैकी ७०५ लाभार्थ्यांना वाटपपत्र देण्यात आले आहे.

तसेच योजना वेळेत पुर्ण करणे व लाभार्थी स्थलांतराबाबत महानगरपालिका स्तरावर अधिकारी व पदाधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरात व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याबाबत**

**(२९) ११००६३ (१८-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकच्या पिशव्या वापरण्यास बंदी असतांनाही परभणी शहरात व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वारंवार परभणी महानगरपालिकेकडे तक्रारी करुनही महानगरपालिकेकडून दोषींवर कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्यामुळे प्लास्टिकचा वापर सर्रास होत असल्याचे माहे डिसेंबर-जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्लास्टीक वापराबाबत कारवाई न करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच प्लास्टिक पिशव्या वापराच्या बंदीवर निर्बंध ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

परभणी शहरात व जिल्ह्यामधील इतर शहरांमध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरत असल्याचे आढळून आल्यावर त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

(२) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये प्लास्टिक बंदी मोहिम चालू असताना हातगाड्यांवर प्लास्टिक/कॅरी बॅग आढळून आल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

(३) महानगरपालिका क्षेत्रात वेळोवेळी प्रभाग समिती निहाय पथके तयार करुन त्यांच्यामार्फत प्लास्टिक कॅरीबॅगेचा साठा जप्त करण्यात येत असून दंड वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दादर (मुंबई) येथील आठ इमारतींचे पुनर्विकासक मे. रिचा इंडिया इन्फ्रा डेव्हलपमेंट प्रा. लि. यांनी रहिवाशांची फसवणुक केल्याबाबत**

**(३०) ११०१३५ (०३-०४-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील सारा मैन्शन, बाळकृष्ण सदन, कथाराडा मैन्शन, सिद्धापूरा, लाहेरा चेम्बर्स, समाधान, महम्मदी मंझिल, अहमद बिल्डिंग, नवरे मंगल कार्यालय पुनर्विकासाचे मे. रिचा इंडिया इन्फ्रा डेव्हलपमेंट प्रा. लि. यांना सन २०११ मध्ये संपूर्ण ८ बिल्डिंग वि. नि. नि. ३३(७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर पुनर्विकासाचे काम ६ वर्षापासून बंद असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासाकडून भाडेकरू / रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन इमारती रिकामी करून घेण्यात आल्या परंतु मागील २ ते ३ वर्षापासून पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडे ही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व तद्नंतर पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्याकरिता विकासकाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे असून विकासकाने साधारण १ वर्षापासून भाडेकरू/ रहिवाश्यांचे पर्यायी जागेचे भाडे दिलेले नाही.

(३) व (४) बाबत, मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दि.२३.०५.२०१६ रोजी मा.आमदार श्री.सदा सरवणकर यांच्या उपस्थितीत भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांची संयुक्त बैठक घेतली. सदर बैठकीस विकासकाचे प्रतिनिधी उपस्थित होते. विकासकाच्या प्रतिनिधीनी, निधी अभावी त्यांचे काम बंद आहे व लवकरच उपाययोजना करुन काम सुरु करण्यात येईल असे सांगितले. तसेच असे आश्वासन दिले की, भाडेकरु / रहिवाश्यांचे थकीत भाडे देण्यात येईल. त्याचप्रमाणे पुनर्विकासाचे काम मध्यतंरी काही तांत्रिक कारणांमुळे थांबविण्यात आले होते. जसे की, हाय राईज समितीचे ना-हरकत प्रमाणपत्र, बांधकाम क्षेत्रफळ २००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यामुळे MOEF ची परवानगी घेणे, हेरिटेजची परवानगी, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे RG हे तळ मजल्यावर देणे बंधनकारक असल्यामुळे, आराखड्यात बदल करावे लागले. तसेच, मेट्रो रेल्वे बाजुने जात असल्यामुळे मेट्रो रेल्वेची परवानगी घेणे गरजेचे होते. त्यामुळे फाऊंडेशच्या डिझाईन मध्ये बदल करावे लागले. अशा सर्व बाबींमुळे बांधकामाबाबत अडचणी निर्माण झाल्या. नुकतीच मेट्रोची NOC मिळालेली आहे. त्यामुळे, यापुढे काम जलद गतीने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन विकासकाच्या प्रतिनिधीने दिले.

---

**मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन (लाल बावटा) तर्फे थकीत वेतन व प्रलंबित मागण्यांबाबत आमरण उपोषण सुरु करण्यात आल्याबाबत**

**(३१) ११०१७७ (१८-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन (लाल बावटा) तर्फे थकीत वेतन व प्रलंबित मागण्यांसाठी नांदेड वाघाळा महानगरपालिका कार्यालया समोर आमरण उपोषण सुरु करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड वाघाळा महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांचे माहे मार्च व एप्रिल, २०१७ चे वेतन अदयाप झालेले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कामगारांचा थकीत वेतन व प्रलंबित मागण्यांसंदर्भात शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन यांनी दि.०३.०१.२०१८ रोजी उपोषणाबाबत नोटिस दिली होती. तथापि, त्यांनी आमरण उपोषण सुरु केले नाही.

(२) व (३) • महानगरपालिका हद्दीअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.ए टू झेड इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीस देण्यात आलेले होते.

• कामावर असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची होती. संबंधित कंत्राटदारास महानगरपालिकेने देयक प्रदान करुनही कंत्राटी कामगारांना माहे डिसेंबर,२०१६ पासून कंत्राटदाराने वेतन दिलेले नाही.

• सदर कंपनीस दिलेले कंत्राट हे मार्च,२०१७ रोजी संपलेले आहे. त्यामुळे कंत्राटदारास महानगरपालिके कडून देय असलेल्या रकमेमधून कंत्राटी कामगारांचे माहे डिसेंबर,२०१६ ते फेब्रुवारी,२०१७ पर्यंतचे वेतन महानगरपालिके मार्फत कंत्राटी कर्मचा-यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आलेले आहे.

• तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामगारांना वेतन देणे बंधनकारक असताना ते न दिल्यामुळे कंत्राटदाराविरुध्द महानगरपालिकेने गुन्हा दाखल केलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर महानगरपालिकेच्या स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्पर्धापरिक्षा केंद्राच्या कामाबाबत**

**(३२) ११०१८४ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्पर्धापरिक्षा केंद्राचे काम निधी अभावी बंद पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्राचे काम सुरु करणेबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत शासनाचे धोरण निश्चित काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) अहमदनगर महानगरपालिकेमार्फत नाविन्यपुर्ण योजनेतून स्पर्धा परीक्षा केंद्राचे काम पुर्ण करण्यात आलेले असून, सद्यस्थितीत सदर केंद्रात स्पर्धा परीक्षेच्या प्रशिक्षणाचे वर्ग नियमितपणे भरत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा परिसरातील १०० वर्षे जुन्या असलेल्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(३३) ११०३६९ (०३-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा परिसरातील १०० वर्षे जुन्या असलेल्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठीच्या प्रकल्पाची योजना म्हाडाने आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी किती टक्के रहिवाश्यांची संमती ग्राह्य धरण्यात आली असून विकासकास पुनर्विकासाचे काम करण्यासाठी कोणते निकष व अटी लावण्यात आल्या आहेत वा एकूण निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर पुनर्विकासात कामाठीपुरा परिसरातील उपकरप्राप्त इमारतींसह नॉनसेस इमारतींचाही समावेश करण्यात आला आहे काय व या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०६-२०१८) :** (१) नाही, याबाबत सदर इमारतींच्या पुनर्विकासासाठी रहिवाशी/ विकासकाकडून कुठलाही प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचे म्हाडाने कळविले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात खुल्या जागांवरील कराची (ओपन लँड टॅक्स) आकारणी जाचक असल्याबाबत**

**(३४) ११०५०२ (१२-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात खुल्या जागांवरील कराची (ओपन लँड टॅक्स) आकारणी जाचक असल्याने अनेक वर्षांपासूनची महानगरपालिकेने ४१८ कोटींची दाखविलेली थकबाकी ही मात्र प्रत्यक्षात ६० ते ७० कोटी इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओपन लँड टॅक्स कमी करण्याच्या मागणीसाठी कल्याण-डोंबिवलीतील बांधकाम व्यावसायिकांची संघटना असलेल्या एमसीएचआयने महानगरपालिकेवर मोर्चा काढण्याचा ठाम निर्धार व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुस-या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनूसार महानगरपालिका प्रशासनाने ओपन लँड टॅक्स कमी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सन १९९० पासून बांधकामाखालील जमिनीवर ओपन लँड टॅक्सची आकारणी करणेत येत असून, सदर ओपन लँड टॅक्सची माहे डिसेंबर २०१७ अखेर मागणी रक्कम रू. ४१९.९८ कोटी इतकी आहे.
• यापैकी मार्च २०१८ अखेर रू. ९५.४८ कोटी वसूल करणेत आलेली आहे.
• मार्च २०१८ अखेर झालेली वसूली पाहता थकबाकी प्रत्यक्षात ६० ते ७० कोटी असल्याचे नमूद केलेली बाब वस्तुस्थितीस धरून नाही.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील बांधकामाखालील जमिनीवरील कर आकारणी जादा असल्याच्या निषेधार्थ दि.१२.०१.२०१८ रोजी CREDAI MCHI कल्याण-डोंबिवली युनिटच्या वतीने मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.
(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत खुल्या जमिनीवर आकारण्यात येणारा मालमत्ता कर हा त्याच जमिनीवर इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर इमारतीकडून प्राप्त होणाऱ्या मालमत्ता करापेक्षा जास्त असल्याने जमिनीवरील भाडे मुल्याच्या दरात १० टक्के परताव्या ऐवजी ३.४६ टक्के परतावा भाडे मुल्याच्या स्वरूपात निश्चित करून सर्व समवेक्षक प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या पटलावर ठेवण्यात आला.
• सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०६, दि. २५.०१.२०१८ रोजी मंजूर झाला आहे.
• सन २०१७-१८ च्या रक्कमेपैकी किमान ५० टक्के रक्कम महापालिकेच्या तिजोरीत जमा झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची अट उपरोक्त ठरावात मंजूर झालेली आहे. कर वसुलीची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्हयातील वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता चौक (ढवळे कॉर्नर) मुख्य रस्त्यावर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली गिटटी, मुरुम व चुरी टाकण्यात येत असल्याबाबत

**(३५) ११०५४३ (१२-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील सिडकोतील वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता चौक (ढवळे कॉर्नर) मुख्य रस्त्यावर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली गिटटी, मुरुम, व चुरी टाकण्यात येत असल्याने रस्त्याची अवस्था जैसे थे असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्यामुळे या रस्त्यावरुन वाहतूक करण्यास अत्यंत अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
तदनुसार उक्त रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) • शहरातील आंतरराष्ट्रीय महामार्ग दुरुस्तीच्या कामानिमित्त वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे त्या महामार्गावरील वाहतुक, वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता आंबेडकर चौक या रस्त्यावर वळविली होती. त्यामुळे सदर रस्ता जड वाहनांमुळे पूर्णत: नादुरुस्त झालेला आहे.
• या रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होण्यासाठी वेळोवेळी खडी, मुरुम व चुरी टाकून रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात येत होती.
• सदर नादुरुस्त रस्ता दुरुस्त करण्याकामी महानगरपालिकेने रु.२.३६ कोटीचे अंदाजपत्रक तयार केलेले असून, त्यास सर्वसाधारण सभेने प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली आहे.
• त्यानुसार सदर कामाचीही निविदा मागविण्यात आली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर काम विहित मुदतीत पूर्ण करुन घेण्यात येईल असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीत असलेली अग्निशमन यंत्रणा बंद असल्याबाबत

**(३६) ११०९२२ (०३-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीत असलेली अग्निशमन यंत्रणा दोन वर्षापासून बंद असल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८)** : (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयात बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा मागील दोन वर्षापासून बंद होती, अशी वस्तुस्थिती नाही.

• विद्युत विभागाने अग्निशमन यंत्रणेची वेळोवेळी दुरूस्ती व देखभाल केलेली असून सदर यंत्रणा सद्या सुरू आहे.

(२) महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतीमध्ये असलेले फायर अर्लाम सिस्टीम, इत्यादीचे नुतनीकरण करणेसाठी चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या बजेटमध्ये पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून, लवकरच त्याचे नुतनीकरण करून संपूर्ण अग्निशमन यंत्रणा सुधारित करण्यात येणार आहे, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेणापूर नगरपंचायत (जि.लातूर) येथील जिल्हा वार्षिक योजना निधीतील व इतर योजनेतील गत वर्षी प्राप्त निधीतील कामे सुरु करण्याबाबत

**(३७) १११९१ (१८-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर नगरपंचायत (जि.लातूर) येथील जिल्हा वार्षिक योजना निधीतील व इतर योजनेतील गत वर्षी प्राप्त निधीतील कामे सुरु करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी तहसील रेणापूर येथील तालुका आढावा बैठकीत मा.मुख्याधिकारी नगरपंचायत रेणापूर यांच्याकडे मागणी करूनही नगरपंचायत रेणापूर येथील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदर कामे अद्यापही सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कामे अद्यापही प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर विलंबाबाबत दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८)** : (१) व (२) तहसिल रेणापूर येथील दि.२४.११.२०१७ रोजीच्या तालुका आढावा बैठकीत शासनाकडून व जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर झालेले अनुदानातून करावयाच्या कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती.

सर्वसाधारण रस्ता अनुदान व नवीन नगरपंचायतींना सहाय्य अनुदान या योजनांच्या कामांचे ठराव मंजूर करुन अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा प्रक्रियेअंती कार्यादेश देण्यात आले आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेतील नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत प्राप्त रु.५० लक्ष इतक्या रकमेतून रु.२२.४७ लक्ष इतक्या रकमेचे एल.ई.डी. पथदिवे बसविण्याचे काम नगरपंचायतीतर्फे हाती घेण्यात आले होते. शासन निर्णय, नगर विकास विभाग दि.१२.०१.२०१८ नुसार एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन उर्जा संवर्धन करण्यासाठी ई.ई.एस.एल. या केंद्र

शासनाच्या सार्वजनिक उपक्रमाशी करारनामा करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने सदर काम रद्द करण्यात आले आहे. उर्वरित निधीतून रस्ते व नालीची कामे प्रस्तावित करण्यात आली असून, त्याकरीता प्रस्ताव तांत्रिक मान्यतेस्तव सादर केला असल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) नगरपंचायत येथे आठ दिवसांनी एकदा पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(३८) १११९९२ (१९-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर नगरपंचायत (जि.लातूर) येथे पाणी मुबलक असतानाही वितरण व्यवस्था व प्रशासनाचे दुर्लक्षामुळे दर आठ दिवसाला एकदा पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाई भासत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निषपन्न झाले व दररोज पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
रेणापूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या रेणा मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता २१.६८५ द.ल.घ.मी. इतकी आहे. दररोज १.२ एम.एल.डी. पाणी रेणापूर नगरपंचायत उपसा करत आहे. त्यानुसार वितरण व्यवस्थेनुसार ४ ते ५ दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. त्याचबरोबर शहरात उपलब्ध असलेल्या नगरपंचायतीच्या मालकीची १ विहीर, ३ विद्युत पंप व ४८ हातपंपाद्वारे देखील नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. याबाबत रेणापूर शहरातील नागरिकांची कोणतीही तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली नाही.
(२) रेणापूर नगरपंचायतीमार्फत Express Feeder बसविण्याचे काम हाती घेतले असून, सदर काम पुर्ण होताच स्त्रोताच्या ठिकाणाहून २४ तास पाणी उपसा करुन २ दिवसातून एकदा पाणी पुरवठा करता येईल, असे जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील अर्धवट रस्त्यांच्या कामांची विभागीय चौकशी करण्यात येत असल्याबाबत**

**(३९) ११२३३९ (१४-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील भ्रष्ट ठेकेदार व अधिकारी यांची चौकशी सुरु असून येथील अर्धवट रस्त्यांच्या कामांची विभागीय चौकशी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्तांनी सांगितले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण व कॉक्रीटीकरण करणेची कामे सुरू आहेत.
• सदर कामे करतेवेळी रस्त्याच्या खालील भागात असणाऱ्या सेवा वाहिन्या, जलवाहिन्या, ड्रेनेज लाईन, जलनि:सारण पाईप लाईन, विद्युत विभागाच्या केबल्स, मोबाईल कंपनी, महानगरगॅस इत्यादी वाहिन्यांचे कायम स्वरूपी रस्त्याच्या कडेने सेवा वाहिन्या सुरू ठेवून, नागरिकांची गैरसोय होणार नाही याचा विचार करून काम करावे लागते.
• याअनुषंगाने कामांना विलंब लागत असल्याने पुढील रस्ते कॉक्रीटीकरण करण्याच्या कामांना विलंब झालेला आहे.
• तसेच काही इमारतींना मा.न्यायालयाचा स्थगन आदेश असल्याने रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत.
• जानेवारी महिन्यात संतोषी माता रस्त्याच्या विलंबाबाबत सर्वसाधारण सभेदरम्यान झालेल्या चर्चेमध्ये आयुक्त यांनी विलंबाच्या कारणाची विभागीय चौकशी करण्यात येईल असे सभागृहास सांगितले, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर प्रकरणी उप आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांची नेमणूक केली असून चौकशी सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुलाबा येथील म्हाडा प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना होत असलेला त्रास**

**(४०) ११२४१५ (०३-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा येथील म्हाडा प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे उदभवणा-या विविध समस्या व मुलभूत सोयीसुविधांच्या अभावामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी (कुलाबा) मा.पालकमंत्री, मुंबई शहर यांना दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०६-२०१८) :** (१) नाही.

याबाबत, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री (उद्योग) यांच्या कार्यालयास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जोनेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनाबाबत लेखी विचारणा केली असता सदरचे निवेदन या कार्यालयाच्या अभिलेखावर दिसून येत नसल्याचे अभिप्राय मा. मत्री (उद्योग) कार्यालयाने दिले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहरामधील इंदिरा खुले नाट्यगृहाच्या दुरवस्थेबाबत**

**(४१) ११२५६५ (१८-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरामधील ऐकमेव असलेले इंदिरा खुले नाट्यगृह एकेकाळी अनेक दिग्गज कलावंताच्या आवाजाने दणाणून जायचे मात्र पुर्नउभारणीचे काम वादात सापडले आणि नगरपालिकेने ही कायमचे दुर्लक्ष केल्याने या नाट्यगृहाची दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली शहरातील व जिल्ह्यातील नागरिकांना सांस्कृतिक कार्यक्रम व नाटकासाठी बाहेरच्या जिल्ह्यात जावे लागत असल्यामुळे नाटक प्रेमींनी व तेथील कलाकारांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी पूर्ण जागेचा वापर करुन पुणे, कोल्हापूर व मुंबईच्या धर्तीवर सुसज्य व सोयी-सुविधा असलेले वातानुकुलीत नविन नाट्यगृह बांधण्यात यावे अशी मागणी जिल्ह्यातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१) हिंगोली शहरातील इंदिरा खुले नाट्यगृहाच्या पुर्नउभारणीचे काम श्री.बी.के. कन्स्ट्रक्शन, पुसद यांना देण्यात आले होते. सदर कंत्राटदार मुदतीत काम पुर्ण करुन देत नसल्यामुळे त्यांना वारंवार नोटीसा देण्यात आल्या होत्या. तद्नंतर सदर कंत्राटदार नियमबाहय मागण्या करुन निविदेतील अटी व शर्तीचा भंग करत असल्याने कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही हिंगोली नगरपरिषदेमार्फत करण्यात आली आहे.

याबाबत संबधित कंत्राटदाराने हिंगोली न्यायालयात दावा दाखल केला असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे खरे आहे.

दि.२४.१२.२०१७ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध होवून नाराजी व्यक्त केली आहे.

तथापि, शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि.२७.०३.२०१८ अन्वये हिंगोली नगरपरिषदेस रु.२५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून, त्यामधून हिंगोली नगरपरिषद अंतर्गत नाट्यगृह बांधकाम करण्यासाठी रु.७,७३,७५,०९४/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेवून, लवकरच सुसज्ज नाट्यगृहाचे बांधकाम करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(३) व (४) नगरपरिषदेच्या मालकीची सर्वे नं.१४६ मधील खुल्या ५ एकर जागेत नवीन नाट्यगृह बांधकामाची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत सुरु असल्याचे जिल्हाधिकारी, हिगोली यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला महानगरपालिकेतील (जि.अकोला) ८९ कर्मचा-यांचे महानगरपालिकेत समायोजन करण्याबाबत**

**(४२) ११३२०४ (१२-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिका (जि.अकोला) हद्दवाढीच्या अधिसुचनेनुसार २४ गावांतील १४ ग्रामपंचायती महानगरपालिकेत समाविष्ट झाल्या असून त्यातील ८९ कर्मचा-यांचे महानगरपालिकेत समायोजन करण्यासंदर्भातील मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेने मा.पालक मंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८९ कर्मचा-यांचे समायोजन महानगरपालिकेत करुन त्यांना वेतनश्रेणी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) संबंधीत ग्रामपंचायतीमधील पात्र कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील समायोजनाची कार्यवाही महापालिका प्रशासनाकडून सुरु असल्याचे, आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**लातूर महानगरपालिकेच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांपासून व सफाई कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ११३३८२ (१२-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर महानगरपालिकेच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे चार महिन्यांपासून व सफाई कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने काही दिवस सानुग्रह अनुदान दिल्यामुळे कर्मचाऱ्यांना वेतन देणे शक्य झाले परंतु अनुदान बंद केले गेल्याने वेतन प्रश्न निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेची मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादी करांची वसुली देखील प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सानुग्रह अनुदान सुरु ठेवण्याबाबत तसेच कर स्वरुपातील वसुली वसूल करुन कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
• माहे नोव्हेंबर,२०१७ चे कार्यालयीन कर्मचा-यांचे वेतन दिनांक ३१.३.२०१८ रोजी व माहे डिसेंबर,२०१७ ते फेब्रुवारी,२०१८ चे वेतन दिनांक २६.३.२०१८ रोजी अदा करण्यात आलेले आहे. सफाई कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी,२०१८ चे वेतन दिनांक २६.३.२०१८ रोजी देण्यात आले आहे.
• लातूर महानगरपालिकेस माहे ऑक्टोबर, २०१६ नंतर सहाय्यक अनुदान बंद झाल्यामुळे तसेच महानगरपालिकेस विविध करामार्फत प्राप्त होणारे महसुली उत्पन्न हे अत्यल्प झाल्यामुळे कर्मचा-यांना वेतन देण्यास विलंब झालेला आहे.
(४)लातूर महानगरपालिकेस महाराष्ट्र वस्तु व सेवा कर अधिनियम २०१७ अंतर्गत दरमहा रु.१.२५ कोटी अनुदान देण्यात येत असून महानगरपालिकेस सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेने संपादित केलेल्या जमिनीची रक्कम अदा करण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४४) ११४१९९ (१२-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकेने संपादित केलेल्या जमिनीची रक्कम अदा करण्यास विलंब होत असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द तसेच महानगरपालिकेला झालेल्या आर्थिक नुकसानी संदर्भात चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन दोषापिंतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन नगरपालिकेने संपादित केलेल्या जमिनींची किंमत जमीन मालकांना वेळोवेळी अदा केलेली आहे.

तथापि, संबंधित जमीन मालकांनी भू-संपादन कायद्यानुसार वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा.न्यायालयात दावे दाखल केले आहेत. त्यापैकी मुख्य ५ प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबित असून, त्यापैकी दोन प्रकरणात मा.न्यायालयाच्या आदेशानुसार जप्ती वॉरंट बजावल्यामुळे, जप्तीची कार्यवाही थांबविण्याकरीता रु.७५ लक्ष व रु.२० लक्ष रक्कम महानगरपालिकेमार्फत मा.न्यायालयात जमा करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर भूसंपादनाच्या प्रकरणांचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी महानगरपालिकेने महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

या प्रकरणांत मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित जमीन मालकांना अदा करावयाच्या वाढीव मोबदल्याच्या रकमेबाबत समितीने जमिन मालकांसोबत वाटाघाटी करुन, निश्चित करण्यात आलेली रक्कम टप्प्या-टप्प्याने देण्याचे महानगरपालिकेमार्फत ठरविण्यात आले आहे.

यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) महानगरपालिकेने जमीन संपादना संदर्भात भू-संपादन कायद्यानुसार कार्यवाही केली असून, जमीन मालकांशी वाटाघाटी करुन, वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन भू-संपादन प्रक्रिया पुर्ण केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसमत (जि.हिंगोली) नगरपालिकेत सहाय्यक अनुदानासाठी जास्तीचे प्राप्त झालेले साडेअकरा कोटी रुपयांच्या प्रकरणांच्या चौकशी अहवालाबाबत**

**(४५) ११४५८० (१८-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) नगरपालिकेत सहाय्यक अनुदानासाठी जास्तीचे प्राप्त झालेले साडेअकरा कोटी रुपयांच्या प्रकरणांची जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या चौकशी समितीने अहवाल अदयापी सादर केला नाही तसेच नगरपरिषद संचालयाच्या संचालकपदी चौकशीचे आश्वासन देवूनही अदयापी चौकशी करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जिल्हाधिकारी चौकशी अहवाल लवकारात लवकर सादर होण्याबाबत तसेच नगरपरिषद संचालयाच्या संचालकांनी दिलेल्या चौकशीचे आश्वासनानंतर चौकशी तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८) :** (१), (२) व (३) वसमत नगरपालिकेस सहाय्यक अनुदानासाठी अतिरिक्त प्राप्त झालेले साडेअकरा कोटी रुपयांच्या प्रकरणांची जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, तो तपासण्यात येत आहे.

---

**अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात फायरमनची २४ पदे रिक्त असल्याबाबत**

**(४६) ११४९२१ (०३-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात फायरमनची २४ पदे रिक्त असल्याने कुली, क्लिनर, मजुर यांचेकडून आग विझविण्याची कामे करुन घेतली जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फायरमनची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
उपलब्ध कर्मचा-यांना विभागाच्या स्तरावर प्राथमिक प्रशिक्षण देवून त्यांचेकडून सदरची कामे करुन घेण्यात येत आहेत.
(२) व (३) अकोला महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता, प्रशिक्षित लिडिंग फायरमन-०२ पदे व फायरमन-२४ पदे व वाहनचालक-०६ पदे कंत्राटी पध्दतीने पुरविण्याबाबतची कार्यवाही महापालिका स्तरावर सुरु असल्याचे, आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेत अनुकंपातत्वावरील नेमणूकीत झालेला गैरव्यवहार**

**(४७) ११५३९८ (१२-०४-२०१८). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये अनुकंपातत्वावरील नेमणूकीमध्ये गैरव्यवहार झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी संबंधितांवर कडक कार्यवाही होईल असे आश्वासन देऊन व त्या अनुषंगाने श्री तुकाराम मुंडे, नवी मुंबई महानगरपालिका यांना शासनातर्फे चौकशीसाठी प्रभाग प्रमुख म्हणून नेमणूक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री तुकाराम मुंडे आयुक्त, महानगरपालिका यांचेकडून शासनास अहवाल प्राप्त झालेला असून वारसाहक्काने नियुक्तीच्या अनियमितेस एकूण ११ अधिकारी जवाबदार ठरले असून संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द झाले असून त्यातील काही अधिकारी निधन पावले व काहींची बदली इतर ठिकाणी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अधिकारी नोकरीत कार्यरत असतांना कामात कसूर केलेला आहे असे कमिशनचे आव्हालानुसार सिद्ध झालेले आहे व सदर अकरा अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (स्थित व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार शिक्षेस पात्र ठरतात व त्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्यता दिलेली आहे असे उपसचिव, नगरविकास विभाग यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ चे पत्र क्रमांक २०१५ प्र .क .७८ / नवी २४ मधून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी लवकरात लवकर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) • औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये माहे जानेवारी, २०१० ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीमध्ये लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार २१८ प्रकरणांमध्ये वारसा हक्काने नियुक्त्या दिलेल्या आहेत.

• या नियुक्त्यांमध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे श्री.तुकाराम मुंडे, भाप्रसे यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली.

• प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार या प्रकरणात ३ उपायुक्त, ३ मुख्य लेखापरिक्षक, ४ आस्थापना अधिकारी व एक विधी सल्लागार असे एकूण ११ अधिकारी दोषी आढळून आले.

• संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार संयुक्त विभागीय चौकशी सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

• वरील ११ अधिका-यांपैकी श्री.विजय जावरे, प्रकल्प संचालक तथा तत्कालीन उपआयुक्त (प्रशासन) यांचे निधन झालेले आहे. उर्वरित १० अधिकाऱ्यांवर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार दोषारोप बजावण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिकेमध्ये हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) चा सन २०१५ पुर्वीचा रेकार्ड उपलब्ध नसल्याबाबत

**(४८) ११५४२४ (१२-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थानाच्या महसुलात वाढीच्या दृष्टीकोनातून २००२ साली TDR कायदा अंमलात आला परंतु अमरावती महानगरपालिका सह.संचालक नगर रचना यांचेकडे सन २०१५ सालापूर्वीचा विकास हक्क दिल्याची नोंद नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २०/०५/२००४ अन्वये विकास हक्क हस्तांतरण बाबत नियमावली प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार अमरावती महानगरपालिकेकडे सन २००५ पासूनचे विकास हक्क हस्तांतरण नोंदवही उपलब्ध असून, ती परिपूर्ण आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

असे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

## अमरावती शहराचे वैभव असलेले नेहरू मैदान स्थित ९० वर्ष जुन्या लाल शाळेला आग लागल्याबाबत

**(४९) ११५७०१ (१२-०४-२०१८). श्री. रवि राणा (बडनेरा)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरातील नेहरू मैदान स्थित ९० वर्ष जुन्या लाल शाळेला दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सायंकाळी ०७ वाजताच्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या शाळेचा जीर्णोद्धार करून अधिक दर्जेदार शिक्षण देणारी शाळा करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८)** : (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी गठीत चौकशी समितीच्या अहवालानुसार, शाळेत असलेल्या ज्वलनशिल रासायनिक द्रव्यामुळे आग लागल्याचे प्राथमिक निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत.

या इमारतीची दुरुस्ती करण्याचे निर्देश बांधकाम विभागाला दिलेले असून, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदर शाळेच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती द्वारे सुरु आहे. स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही निश्चीत केली जाईल, असे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

## नाशिक येथील पंचवटी भागासाठी काश्यपी या मध्य प्रकल्पातून थेट पाईपलाईन टाकण्याच्या प्रस्तावाबाबत

**(५०) ११५९९५ (१२-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ४३३ (39)

(१) नाशिक येथील पंचवटी भागासाठी काश्यपी या मध्य प्रकल्पातून थेट पाईपलाईन टाकण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाला तातडीने मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१८)** :(१) सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत असा प्रस्ताव कार्यवाहीत नाही.

तथापि, महानगरपालिका हद्दीतील पाणी पुरवठ्याचे सुसुत्रीकरण करण्याकरीता महानगरपालिकेने सन २००९ मध्ये मुख्य आराखडा (Master Plan) तयार केला असून, त्यामध्ये भविष्यात पंचवटी विभागातील उंच भागासाठी कश्यपी धरणातून थेट पाणी पुरवठा योजना प्रस्तावित केली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**